RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक १२७] बुधवार, डिसेंबर १६, २०२०/अग्रहायण २५, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३११**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ डिसेंबर २०२०

**संदर्भ .—** पणन संचालक, महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे क्रमांक पणन-५/
कृउबास/हमीभाव/शेतमाल/बा.फी/सवलत/२०/३१६७
दिनांक २५ सप्टेंबर, २०२० चे पत्र.

**आदेश**

**महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम, १९६३ आणि नियम, १९६७.**

क्रमांक सपस.२०२०/प्र.क्र. १७३/२४-स.–ज्याअर्थी, केंद्र शासनाने घोषित केलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा शेतमालाचे बाजारातील दर कमी राहिल्यास, केंद्र शासनाच्या Price Support Scheme (PSS) या योजनेंतर्गत कडधान्य व तेलबिया संबंधित शेतमालाची हमीभावाने नाफेडच्यावतीने आतापर्यंत खरेदी केली जात आहे.

ज्याअर्थी, हंगाम २०२०-२१ मध्येही राज्यात किमान आधारभूत किमतीने कडधान्ये व तेलबिया खरेदीची योजना राबविण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार नाफेडच्या वतीने महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या., मुंबई, विदर्भ सहकारी पणन महासंघ मर्या., नागपूर व महाएफपीसी, पुणे या संस्था “ राज्य नोडल संस्था ” म्हणून आणि त्यांनी नियुक्त केलेल्या सब एजंट संस्था प्रत्यक्ष खरेदीसाठी राज्यात कार्यरत असणार आहेत, आणि

ज्याअर्थी, बाजार समितीच्या बाजार क्षेत्रात होणाऱ्या खरेदी-विक्रीवर महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम, १९६३, कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार बाजार फी आकारण्याचे अधिकार बाजार समितीस प्राप्त आहेत.

ज्याअर्थी, राज्यातील हमीभावाने खरेदीची बहुतांश खरेदी केंद्रे ही कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कार्यरत असल्यामुळे हमीभावाने खरेदीचे कामकाज बाजारक्षेत्रात होणार आहे. परिणामी, सदर खरेदी-विक्रीवर बाजार समितीकडून कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार बाजार फी तसेच कलम ३४(अ) मधील तरतुदीनुसार देखरेख शुल्क इत्यादी आकारण्यात येणार आहे.

ज्याअर्थी, केंद्र शासनाने ऑक्टोबर,२०१८ मध्ये प्रधानमंत्री अन्नदाता आय सुरक्षा (PM-AASHA) अभियान या योजनेंतर्गत किमान आधारभूत किमतीवर PSS योजनेंतर्गत खरेदीसाठी निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांमध्ये किमान आधारभूत दराने PSS योजनेंतर्गत होणाऱ्या खरेदीच्या कामकाजासाठी राज्य कोणतीही फी, सेवाशुल्क व कर यामध्ये सुट देईल. यासाठी, संबंधित राज्य शासन/ केंद्र शासित प्रदेशाने अधिसूचना निर्गमित करण्याचे सूचित केले आहे.

ज्याअर्थी, किमान आधारभूत किमतीवर होणारी खरेदी ही केंद्र शासनाच्या PSS योजनेंतर्गत होणारी खरेदी असल्यामुळे, यासाठी राज्यात आकारण्यात येणारे सर्व सेवाशुल्क व करामध्ये सुट देणे आवश्यक आहे, अशी शासनाची खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५९ अन्वये, शासनास असलेल्या अधिकाराचा वापर करून (हंगाम २०२०-२१ साठी) राज्यात किमान आधारभूत किमतीवर PSS योजनेंतर्गत कडधान्ये व तेलबिया खरेदीच्या कामकाजासाठी (खरेदी, वाहतूक, साठवणूक व विक्री) महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम, १९६३ चे कलम ३१(१), ३४(अ) व ३४(ब) मधील तरतुदीनुसार सूट देऊन बाजार फी व अन्य सर्व सेवा कर / शुल्क माफ करण्यास या आदेशाद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**का. गो. वळवी,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.